प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

**भारतीय रिज़र्व बैंक**

**RESERVE BANK OF INDIA**

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi

Website : www.rbi.org.in

ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001

**Department of Communication**, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai - 400 001 फोन/Phone: 022 - 2266 0502

# भारतीय रिझर्व्ह बँकेने यवतमाळ अर्बन को-ऑपरेटीव बँक लिमिटेड, यवतमाळ (महाराष्ट्र) वर आर्थिक दंड ठोठावला

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक 26 डिसेंबर 2024, रोजीच्या आदेशाद्वारे यवतमाळ अर्बन को-ऑपरेटीव बँक लिमिटेड, यवतमाळ (महाराष्ट्र) (बँक) वर भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे नागरी सहकारी बैंकांसाठी पर्यवेक्षी कृती फ्रेमवर्क (SAF) जारी केलेल्या विशिष्ट निर्देशांचे तसेच 'एक्सपोजर नॉर्म्स आणि वैधानिक/इतर निर्बंध -UCB' या अंतर्गत काही विशिष्ट निर्देशांचे पालन न केल्याबद्दल ₹5 लाख (फक्त पाच लाख रुपये) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. बँकिंग नियमन कायदा, 1949 (BR कायदा) च्या कलम 46(4)(i) आणि 56 सह लागू असलेल्या कलम 47(A)(1)(c) अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करताना हा दंड ठोठावण्यात आला आहे.

31 मार्च 2024 रोजीच्या आर्थिक स्थितीवर आधारित बँकेची वैधानिक तपासणी भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे केली गेली होती. या तपासणी अहवालातील पर्यवेक्षी निष्कर्षांचे पालन न केल्याने आणि यासंबंधी केलेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे बँकेला नोटीस बजावण्यात आली होती, त्यात म्हटल्याप्रमाणे, वरील निर्देशांचे पालन करण्यास अयशस्वी झाल्याबद्दल बँकेला दंड का आकारला जाऊ नये याची कारणे दाखवा अशी विचारणा करण्यात आली होती. नोटीसला बँकेने दिलेले उत्तर व वैयक्तिक सुनावणीच्या वेळी बँकेने सादर केलेले तोंडी निवेदन विचारात घेता, अन्य बाबिंसह, भारतीय रिझर्व्ह बँक या निष्कर्षावर पोहोचली कि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या खालील निर्देशांचे पालन न केल्याचे आरोप सिद्ध होतात आणि आर्थिक दंड लावला जाणे आवश्यक आहे.

बँके ने

i) SAF अंतर्गत जारी केलेल्या निर्देशांचे उल्लंघन करून 100% पेक्षा जास्त जोखमीचे वजन असलेले नवीन कर्ज आणि अग्रिम मंजूर केले.

ii) नाममात्र सदस्यांना विहित नियामक मर्यादेपेक्षा जास्त कर्ज मंजूर केले .

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यात बँकेने तिच्या ग्राहकांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारांच्या किवा करारांच्या वैध्यतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही. तसेच, बँकेविरुद्ध भारतीय रिझर्व्ह बँकेने सुरू केलेल्या इतर कोणत्याही कारवाईबद्दल पूर्वग्रह न ठेवता हा आर्थिक दंड लावला आहे.

**प्रेस प्रकाशनी : 2024-2025/1813**

**(पुनीत पांचोली)**

मुख्य महाप्रबंधक